स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या मानव्य विद्याशाखेअंतर्गत,

मराठी विषयात पीएच्.डी. पदवीसाठी सादर करावयाच्या शोध प्रबंधाचा आराखडा

संशोधन विषय

'महात्मा बसवेश्वरांचा संत मन्मथ स्वामींच्या साहित्यावरील प्रभाव : एक अभ्यास'

मार्गदर्शक

डॉ. रवींद्र वैजनाथराव बेम्बरे

प्रमुख, प्रमुख मराठी विभाग

वै. धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालय, देगलूर जि. नांदेड

संशोधक

श्री. शेषेराव लक्ष्मणराव चोपडे

सहशिक्षक (मराठी)

नूतन विद्यालय हायस्कूल, उमरी

ता. उमरी, जि.नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ 2019

महात्मा बसवेश्वरांचा संत मन्मथ स्वामींच्या साहित्यावरील प्रभाव : एक अभ्यास

प्रस्तावना :-

शिव संस्कृती ही एक जगातील प्राचीन संस्कृती आहे. या शिव संस्कृतीतील काही सत्व स्वीकारून महात्मा बसवेश्वरांनी जगाला नवी दिशा दाखवण्यासाठी बाराव्या शतकात लिंगायत धर्माचा पाया रचला. सनातन वैदिक धर्मातील यज्ञयागादी कर्मकांड, मंदिर महात्म्य, पुरोहितशाही, विसंगत व्रतवैकल्ये आणि अस्पृश्यता नाकारली. नव्या समाजाची उभारणी करण्याच्या भूमिकेतून सामूहिक चिंतन घडवून आणण्यासाठी कल्याण येथे अनुभव मंटपाची स्थापना केली. या अनुभव मंटपात देश विदेशातील ७७० सदस्य होते. या सर्वांना अभिव्यक्तीचे समान स्वातंत्र्य होते. या अनुभव मंटपातील चिंतनातून बाराव्या शतकात कन्नड वचन वाङ्मय अकाराला आले. या सर्व क्रांतीचे केंद्रबिंदू महात्मा बसवेश्वर होते. महात्मा बसवेश्वरांनी अस्पृश्यता नाकारून समतेचा पुरस्कार केला. धर्माने नाकारलेल्या स्त्रीला धर्माच्या प्रवाहात आणले. महार, मांग, ढोर, चांभार, नावाडी, डोंबारी या जातीतील लोकांना जोडून त्यांना आत्मसन्मान मिळवून दिला. समता, बंधुता, क्षमा, दया, शांती, सामाजिक सद्‌भाव, उद्योगशीलता या कल्याणकारी मूल्यांचा केवळ उद्‌घोष न करता ते मूल्य त्यांनी कृतीत उतरवले. बसवेश्वरांच्या या क्रांतिकारी विचाराचा आणि वचन साहित्याचा प्रभाव प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे दक्षिण भारतातील समग्र संत साहित्यावर जाणवतो. म्हणून अलिकडील अनेक अभ्यासक महात्मा बसवेश्वरांना दक्षिण भारततला बुद्ध संबोधतात. महात्मा बसवेश्वरांचा आणि महाराष्ट्राचा अत्यंत जवळचा अनुबंध आहे. महात्मा बसवेश्वरांचे बालपण सोलापूर जिल्हयातील मंगळवेढा येथे गेले. महात्मा बसवेश्वरांची कल्याण क्रांती ज्या ठिकाणी घडली ती चालुक्याची राजधानी कल्याण हे महाराष्ट्राला विशेषतः मराठवाडयाला लगत असल्यामुळे इतर प्रांताच्या तुलनेत महाराष्ट्रातील संत साहित्यावर महात्मा बसवेश्वरांचा प्रभाव अधिक आहे.

महात्मा बसवेश्वरांच्या नंतर बसवप्रणित लिंगायत धर्माचा महाराष्ट्रात प्रचार व प्रसार मोठया प्रमाणात झाला. त्यातून पुढे मराठी लिंगायत संत साहित्याची परंपरा प्रवाहीत झाली. मराठी लिंगायत संत साहित्य प्राचीन शैव परंपरेशी किंवा संस्कृत साहित्याशी नाते सांगत असले तरी त्यावर महात्मा बसवेश्वरांच्या विचारांचा प्रभाव अधिक आहे. मराठवाडा कर्नाटक लगत असल्यामुळे महाराष्ट्रातील इतर भागाच्या तुलनेत मराठवाडयातच लिंगायत संत साहित्य अधिक बहरले. विसोबा खेचर यांच्यापासून लिंगायत संत साहित्याची परंपरा प्रवाहीत झाल्याचे काही अभ्यासक मान्य करतात. पण त्याबद्दल एकमत आढळत नाही. शिखर शिंगणापूरचे शांतलिंग स्वामी यांना काही अभ्यासक आद्य लिंगायत संत साहित्यिक संबोधतात पण त्यांच्या साहित्यावर वैदिक विचारधारेचाही प्रभाव जाणवतो.

मराठी लिंगायत संत साहित्याला सर्वांगाने समृद्ध करणारा एक महत्त्वपूर्ण संत म्हणून संत मन्मथ स्वामीकडे पाहतात. त्यांच्या साहित्यातील विचाराचा रोख लक्षात घेऊन काही अभ्यासक मन्मथ स्वामींना महाराष्ट्राचे महात्मा बसवेश्वर म्हणून गौरवितात ; तर काही अभ्यासक मन्मथ स्वामींनी मराठी लिंगायत संत साहित्याची भक्कम पायाभरणी केल्यामुळे त्यांना लिंगायतांचे ज्ञानेश्वर म्हणतात. संस्कृत शैव साहित्य आणि महात्मा बसवेश्वरांचे वचन वाङ्मय यांच्या प्रभावातून मन्मथ स्वामींचे साहित्य आकाराला आले. मन्मथ स्वामींच्या एकंदर वाङ्मयावर पदोपदी महात्मा बसवेश्वरांच्या कार्याचा आणि वचन साहित्याचा प्रभाव जाणवतो.

<u>विषय निवडीचे औचित्य / हेतूः-</u>

लिंगायत परंपरेत माझा जन्म झाल्यामुळे बालपणापासूनच महात्मा बसवेश्वरांच्या विचारांचा प्रभाव माझ्यावर पडला. त्याचबरोबर मराठी लिंगायत संत परंपरेतील मन्मथ स्वामींचे साहित्य माझ्या वाचनात आले. मन्मथ स्वामींचे साहित्य वाचत असताना अनेक वेळा मन्मथ स्वामींच्या साहित्यात महात्मा बसवेश्वरांच्या वचन साहित्याचे प्रतिबिंब उमटल्याचे दिसले.

मन्मथ स्वामी आपल्या भाष्यग्रंथातून संस्कृत शैव साहित्यावर भाष्य करीत असले तरी त्यावर महात्मा बसवेश्वरांच्या विचारांचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष प्रभाव पहायला मिळतो. मन्मथ स्वामींच्या स्फुट अभंगातून महात्मा बसवेश्वरांच्या वचनातील विचार निराळया पध्दतीने प्रकट झाले आहेत. म्हणून मन्मथ स्वामींच्या साहित्यावर महात्मा बसवेश्वरांच्या विचाराचा जो प्रभाव आहे. त्याबद्दल माझ्या मनात कुतूहल निर्माण झाले. त्यादृष्टीने पूर्व साहित्य आणि संशोधनाचा आढावा घेतल्यानंतर मन्मथ स्वामींच्या साहित्यावरील महात्मा बसवेश्वरांचा प्रभाव शोधण्याच्या दृष्टीने संशोधन झाल्याचे मला आढळले नाही. म्हणून संशोधन क्षेत्रातील ही उणीव भरून काढण्याच्या भूमिकेतून ‘महात्मा बसवेश्वरांचा संत मन्मथ स्वामींच्या साहित्यावरील प्रभाव : एक अभ्यास’ हा विषय मी प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेला आहे.

संशोधन पध्दती :-

प्रस्तुत संशोधनात मी वर्णनात्मक आणि तौलनिक संशोधन पध्दतीचा अवलंब करणार आहे. दोन्ही व्यक्तींच्या चरित्राचा आणि वाङ्मयाचा ऐतिहासिक दृष्टिकोनातून अभ्यास करणार आहे. त्यातून महात्मा बसवेश्वरांचा मन्मथ स्वामींच्या साहित्यावरील प्रभावाचा शोध घेणार आहे. या संशोधनात संशोधन सामग्री म्हणून महात्मा बसवेश्वरांचे अनुवादीत वचन साहित्य, त्यांचे चरित्र वाङ्मय, मन्मथ स्वामींचे सर्व भाष्यग्रंथ आणि अभंग वाङ्मय यांचा मूळातून अभ्यास करणार आहे. त्याचबरोबर या विषयाशी निगडित विविध संदर्भ ग्रंथ, अप्रकाशित शोधप्रबंध, नियतकालिके आणि मासिकांचा आधार घेतला जाणार आहे.

संशोधनाची उद्दिष्टये :-

1. महात्मा बसवेश्वरांचे चरित्र, कार्य व वचन साहित्याचा अभ्यास करणे.
2. महात्मा बसवेश्वरांच्या वचन साहित्यातील मूल्यांचा शोध घेणे.
3. महात्मा बसवेश्वरांच्या कार्याचा व साहित्याचा मराठी लिंगायत संत साहित्यावरील प्रभाव अभ्यासणे.
4. संत मन्मथ स्वामींच्या जीवन व साहित्यावर महात्मा बसवेश्वरांचा प्रभाव अभ्यासणे.
5. मन्मथ स्वामींच्या साहित्याचा महात्मा बसवेश्वरांशी असणारा अनुबंध स्पष्ट करणे.

गृहितके :-

प्रस्तुत विषयावर संशोधन करत असतांना खालील गृहितके निश्चित करण्यात आली आहेत.

1. महात्मा बसवेश्वरांचा एकंदर मराठी लिंगायत संत साहित्यावर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष प्रभाव आहे.

2. संत मन्मथ स्वामीं हे संस्कृत शैव वाङ्मया प्रमाणेच महात्मा बसवेश्वरांच्या वचन वाङ्मयाशी परिचित होते.

3. मन्मथ स्वामींनी आपल्या साहित्यातून महात्मा बसवेश्वरांच्या विचारांची मांडणी केली.

4. भाष्यग्रंथांच्या तुलनेत मन्मथ स्वामींच्या अभंगावर बसवेश्वरांचा अधिक प्रभाव आहे.

संशोधन विषयाचे महत्त्वः-

'महात्मा बसवेश्वरांचा संत मन्मथ स्वामींच्या साहित्यावरील प्रभाव : एक अभ्यास' या विषयावरील संशोधनातून मराठी संत साहित्याच्या संशोधनात एक मौलिक भर पडणार आहे. यातून कन्नड आणि मराठी संत साहित्याचा अनुबंध स्पष्ट होणार आहे. मन्मथ स्वामी आणि मराठी लिंगायत संत साहित्यावर संशोधन करणाऱ्या पुढील संशोधकासाठी हे संशोधन मार्गदर्शक ठरणार आहे. मराठी संत साहित्य, कन्नड संत साहित्य, तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास या विविध ज्ञानशाखेला समृध्द करणारे प्रस्तुत संशोधन आहे.

संदर्भ साहित्याचा आढावा :-

मराठी वीरशैव लिंगायत संत साहित्यावर आजपर्यंत अनेक मान्यवर अभ्यासकांनी विविध अंगाने अभ्यास करून त्यावर प्रकाश टाकला आहे. त्याचा धावता अढावा मी येथे घेणार आहे. डॉ. चंद्रकांत देऊळगावकर यांनी संत मन्मथ स्वामी व्यक्ती आणि वाङ्मय या विषयावर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद संशोधन

करून प्रबंध सादर केला. डॉ. राम तोंडारे यांनी मराठी वीरशैव संतांची अभंगवाणी : एक चिकित्सक अभ्यास या विषयावर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद संशोधन करून शोध प्रबंध सादर केला. डॉ. सुधाकर मोगलेवार यांनी मराठी वीरशैव साहित्यावर संशोधन केले. डॉ. शं. दे. पसारकर, डॉ. भि.शि. स्वामी यांनी मन्मथ स्वामींच्या साहित्यावर संशोधन केले. डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपूरकर यांनी मन्मथ स्वामींच्या साहित्याचे मोठया प्रमाणात प्रकाशन केले. कुमार कोठावळे यांनी पहिल्यांदा मन्मथ स्वामींचे चरित्र लिहिले. महात्मा बसवेश्वरांचा मन्मथ स्वामींच्या साहित्यावरील प्रभाव या विषयावर संशोधन आणि लेखन झाल्याचे मला आढळले नाही. यामुळे मी प्रस्तुत विषय निवडला आहे.

संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा :-

प्रस्तुत संशोधनात महात्मा बसवेश्वर यांच्या चरित्राचा व उपलब्ध वचन साहित्याचा सविस्तर अभ्यास केला जाणार असून त्याचबरोबर महात्मा बसवेश्वर समकालीन निवडक शरणांच्या वचन वाङ्मयाचा अभ्यास केला जाणार आहे. त्याचबरोबर मन्मथ स्वामीपूर्व मराठी लिंगायत संत साहित्याचा धावता आढावा घेऊन मन्मथ स्वामींचे भाष्यग्रंथ, अभंग वाङ्मय व स्फुट वाङ्मय यांचा सविस्तर अभ्यास केला जाणार आहे. या संशोधनाच्या केंद्रस्थानी महात्मा बसवेश्वर आणि संत मन्मथ स्वामी यांचेच साहित्य राहणार आहे.

शोधप्रबंधाच्या प्रकरणाची रुपरेषा :-

संशोधनासाठी निवडलेल्या विषयाची व्याप्ती व मर्यादा लक्षात घेऊन ‘महात्मा बसवेश्वरांचा संत मन्मथ स्वामींच्या साहित्यावरील प्रभाव : एक अभ्यास’ या विषयाचा सूक्ष्मपणे अभ्यास करण्यासाठी शोधप्रबंधाची रचना एकूण पाच प्रकरणामध्ये केली आहे.

प्रकरण पहिले

महात्मा बसवेश्वर जीवन व कार्य

या प्रकरणात महात्मा बसवेश्वरपूर्व सामाजिक, धार्मिक व राजकीय परिस्थिती, महात्मा बसवेश्वरांचे जन्म, बालपण, शिक्षण, राजा बिज्जलच्या दरबारात त्यांनी भूषविलेली विविध पदे, महात्मा बसवेश्वरांनी उभे केलेले अनुभव मंटप, महात्मा बसवेश्वरांनी काळाच्या पुढे जाऊन केलेले क्रांतिकारी कार्य याबाबींचा अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण दुसरे

महात्मा बसवेश्वरांचे वचन साहित्य

प्रस्तुत प्रकरणात वचन वाङ्मयाची संकल्पना, बसवेश्वरांचे वचन वाङ्मय लेखनामागील प्रेरणा आणि प्रयोजन, वचन वाङ्मयातील अष्टावरण, पंचाचार, षट्स्थल सिध्दातांचा अभ्यास केला जाणार आहे. याशिवाय वचन वाङ्मयातील समता, बंधुता, क्षमा, दया, शांती, सामाजिक सद्भाव, उद्योगशीलता, दासोह या मूल्यांचा अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण तिसरे

संत मन्मथ स्वामी चरित्र व वाङ्मय

या प्रकरणात मन्मथपूर्व महाराष्ट्रातील सामाजिक, धार्मिक, राजकीय परिस्थिती. मन्मथ स्वामींचे जन्म व बालपण, घरातील वातावरण, शिक्षण, मन्मथ स्वामींनी उमेदवारीच्या काळात केलेली शाहिरी, मन्मथ स्वामींचे भाष्यग्रंथ, अभंग, स्फुट वाङ्मय याचा आढावा या प्रकरणात घेतला जाणार आहे.

प्रकरण चौथे

मन्मथकृत भाष्यग्रंथावरील महात्मा बसवेश्वरांच्या वचन साहित्याचा प्रभाव

प्रस्तुत प्रकरणात मन्मथकृत 'अनुभवानंद', 'स्वयंप्रकाश', ' गुरुगीता', 'ज्ञानबोध', आणि 'परमरहस्य' या ग्रंथावर बसवेश्वरांच्या वचन वाङ्मयाचा पडलेल्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष प्रभावाचा अभ्यास केला जाणार आहे. 'परमरहस्य' या भाष्यग्रंथावर बसवेश्वरांच्या वचन साहित्याचा प्रभाव अधिक असल्यामुळे या ग्रंथाचा विस्ताराने विचार केला जाणार आहे.

प्रकरण पाचवे

मन्मथकृत अभंगावरील महात्मा बसवेश्वरांचा प्रभाव

मन्मथ स्वामींचे जे उपलब्ध अभंग आहेत त्या अभंगांच्या आशयावर महात्मा बसवेश्वरांच्या वचनातील विचारांचा प्रभाव अभ्यासला जाणार आहे. यात महात्मा बसवेश्वरांच्या वचन वाङ्मयातील मूल्यांचा प्रभाव मन्मथ स्वामींच्या अभंगावर कसा पडला, त्याचा सूक्ष्मपणे विचार केला जाणार आहे.

निष्कर्षात्मक समारोप :-

प्रस्तुत प्रकरणात सर्व प्रकरणातून हाती आलेल्या निष्कर्षांचा एकत्रित विचार करून महात्मा बसवेश्वरांच्या वचन वाङ्मयाचा मन्मथ स्वामींच्या अभंगावरील प्रभाव सिध्द केला जाणार आहे.

संदर्भ ग्रंथ सूची :-

१. डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपूरकर(संपादक) :- संत शिरोमणी मन्मथ स्वामीकृत कर्मब्रह्म संपदा अर्थात सार्थ परमरहस्य, -संस्कृती प्रकाशन वीरमठ राजूर. द्वितीयावृत्ती २०११.

२. डॉ.शिवलिंगशिवाचार्य महाराज अहमदपूरकर :- श्री. संत शिरोमणी मन्मथ स्वामी व्यक्तीरेखा आणि ग्रंथसंपदा, डॉ. - संस्कृती प्रकाशन वीरमठ राजूर. प्रथमावृत्ती शके १९८७.

३. डॉ. भी. शि. स्वामी :- श्री. मन्मथ स्वामींची अभंगवाणी (सार्थ स्पष्टीकरण), अनिल प्रिंटींग प्रेस सोलापूर, प्रथमावृत्ती २००३.

४. श्री.कुमार कोठावळे :- शिवयोगी श्री. मन्मथ स्वामी चरित्र, वाङ्मय व कार्य, मन्मथ स्वामी देवस्थान पंचकमिटी, परळी, प्रथमावृत्ती १९७३.

५. डॉ. सुधाकर मोगलेवार :- मराठी वीरशैव साहित्य, नटरंग प्रकाशन, नागपूर. प्रथम मुद्रण १९७७.

६. डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज :- शिव संप्रदायाची गाथा, संस्कृती प्रकाशन वीरमठ राजूर अहमदपूरकर(संपादक)

७. श्री.फ.गु. हळकट्टी :- वचन सिद्धांत सार, मूळ संपादक - प्रा. आर. एम. करडीगुद्दी, मराठी अनुवाद- महाराष्ट्र बसव परिषद भालकी. जि. बीदर कर्नाटक. प्रथमावृत्ती २०१६.

८. डॉ. एम.एम. कलबुर्गी :- वचन, संपादक - कन्नड मूल
श्री.शंकर म. पाटील मराठी अनुवाद- सविता सि. नडकट्टी, बसव समिती बेंगळूरु. प्रथमावृत्ती २०१२.

९. डॉ. बसवलिंग पट्टदेवरू :- षट्स्थल दर्शन, महाराष्ट्र बसव परिषद, भालकी जि. बीदर कर्नाटक. प्रथमावृत्ती २०१३.

१०. डॉ. ल. रा. नसिराबादकर :- प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, फडके प्रकाशन कोल्हापूर. अकरावी आवृत्ती-२०१६.

११. डॉ. ह. श्री. शेणोलीकर :- प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, डायमंड पब्लिकेशन, पुणे. प्रथमावृत्ती २०११.

१२. डॉ.श्री. अशोक कामत :- पसायदानाची अपूर्वाई, गोकुळ प्रकाशन पुणे. प्रथमावृत्ती १९९४.

१३. मन्मथ गाथा :- काडादी वीरशैव धर्मदाय निधी ट्रस्ट, प्रकाशन सोलापूर १९६५.

१४. श्री.कुमार कोठावळे :- शिवयोगी मन्मथ स्वामी- श्री. मन्मथ स्वामी देवस्थान कमिटी कपिलधार, जि.बीड १९७३.

१५. डॉ.श्री. रा.चिं. ढेरे :- प्राचीन मराठीच्या नवधारा- मोघे प्रकाशन, कोल्हापूर १९७९.

१६. डॉ. रवींद्र वैजनाथराव बेम्बरे संत मन्मथ दर्शनप्रथमावृत्ती२०१९ महाराष्ट्र बसव परिषद, भालकी जि. बीदर कर्नाटक.

अप्रकाशित शोधप्रबंध :-

१. श्री.चंद्रकांत देऊळगावकर :- संत मन्मथ स्वामी व्यक्ती आणि वाङ्मय, मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, सप्टेंबर १९७५.

२. प्रा.श्री.राम तोंडारे :- मराठी वीरशैव संतांची अभंगवाणी : एक चिकित्सक अभ्यास, मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद, जून १९८०.

३. डॉ.श्री. चंद्रशेखर कपाळे :- वीरशैव मराठी संतकवी बसवलिंग यांच्या समग्र साहित्याचा अभ्यास, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, एप्रिल १९८९.

मार्गदर्शक

डॉ. रवींद्र वैजनाथराव बेम्बरे
प्रमुख, मराठी विभाग
वै.धुंडा महाराज देगलूरकर
महाविद्यालय, देगलूर.
दूरभाष्य - ९४२०८१३१८५

संशोधक

श्री. शेषेराव लक्ष्मणराव चोपडे
सहशिक्षक (मराठी)
नूतन विद्यालय हायस्कूल, उमरी.
दूरभाष्य - ८९७५७९५५६०